आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१९ एप्रिल २०२६ - रविवार

**ठळक बातम्या**

- महिला आरक्षणासाठीचं घटनादुरूस्ती विधेयक संसदेत मंजूर न झाल्याबद्दल प्रधानमंत्र्यांकडून खंत व्यक्त; काँग्रेस विभाजनाचं बीज पेरत असल्याचा आरोप

- काँग्रेसचा महिला आरक्षणाला पाठिंबा असल्याचं मल्लिकार्जून खरगे यांचं प्रतिपादन; प्रधानमंत्र्यांनी शासकीय यंत्रणेचा गैरवापर केल्याचा खरगे यांचा आरोप

- नाशिक जिल्ह्यातल्या एका आयटी कंपनीतल्या कथित धर्मांतर प्रकरणाचा सखोल तपास करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

- राज्यासह देशभरात अक्षय्य तृतीयेचा उत्साह

**आणि**

- भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून अजित आगरकर यांना मुदतवाढ

**<><><><><>**

महिला आरक्षणासाठीचं घटनादुरूस्ती विधेयक संसदेत मंजूर न झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी खंत व्यक्त केली आहे. त्यांनी काल देशवासियांना दूरस्थ पद्धतीने संबोधित केलं. सरकारने प्रयत्न करूनही नारी शक्ती वंदन अधिनियमात दुरूस्ती होऊ शकली नाही याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. महिला आरक्षणाच्या नावाखाली सरकार लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना करू पाहत असल्याचा विरोधकांचा आरोप फेटाळून लावत प्रधानमंत्र्यांनी विरोधकांच्या हेतूवर शंका उपस्थित केली.

**- होल्ड बाईट मोदी - -**

**<><><><><>**

गेल्या बारा वर्षांत काहीही ठोस करू न शकलेले प्रधानमंत्री नैराश्यग्रस्त झाले असून कालच्या त्यांच्या भाषणात त्यांनी केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप केल्याची टीका काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी समाजमाध्यमावर केली आहे. राज्यांच्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असताना प्रधानमंत्र्यांनी शासकीय यंत्रणांचा गैरवापर केला,

ही लोकशाही आणि राज्यघटनेची विटंबना आहे, असं खरगे म्हणाले. काँग्रेसने महिला आरक्षणाला नेहमी पाठिंबा दिला आहे, २०२३ ला महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा दिला, याच विधेयकाची अधिसूचना १६ एप्रिलला सरकारने काढली असं खरगे म्हणाले.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्व पक्षाचे प्रमुख नेते आपापल्या उमेदवारांचा जोरदारपणे प्रचार करत आहेत.

भाजपाचे नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमध्ये बांकुरा जिल्ह्यात बिष्णुपूर इथं एका प्रचार सभेला संबोधित केलं. महिला आरक्षण विधेयक रोखण्यासाठी तृणमूल काँग्रेसनं काँग्रेससोबत संगनमत केलं, जनता त्यांना याची शिक्षा देईल अशी टीका त्यांनी केली. पुरुलिया इथल्या एका रॅलीलाही त्यांनी संबोधित केलं. तृणमूल काँग्रेसच्या भ्रष्टाचारी कारभारामुळे राज्यातल्या जनतेत भीतीचं वातावरण निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला.

तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही हुगळी आणि पूर्व वर्धमान जिल्ह्यात प्रचार सभा घेतल्या. भाजपा लोकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी आज  त्या तारकेश्वर, कालना आणि मोंतेश्वर इथंही प्रचारसभा घेणार आहेत.

काँग्रेस, डावे पक्ष आणि इतर राजकीय पक्षांकडूनही राज्यात जोरदार प्रचार सुरु आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तमिळनाडूत इरोडमध्ये शिवगिरी आणि मोडाकुरुची इथं प्रचार केला. द्रमुक सरकार निष्क्रिय असून त्यांनी लोककल्याणाकडे दुर्लक्ष केल्याची टीका त्यांनी केली. अण्णा द्रमुकचे सरचिटणीस एडप्पाडी के. पलानीस्वामी यांनी नामक्कल इथं प्रचार केला. आपला पक्ष सत्तेवर आल्यास शेतकऱ्यांना चौदाशे युनिट मोफत वीज देण्याची घोषणा त्यांनी केली.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी तामीळनाडूच्या उत्तरेकडेच्या जिल्ह्यांमध्ये आपल्या उमेदवारांचा प्रचार केला. राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनीही कोईम्बतूर, तिरुपूर आणि निलगिरी भागात धर्मनिरपेक्ष पुरोगामी आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचार फेरीत सहभाग घेतला. तर कणिमोळी यांनी वृद्धाचलम इथं प्रचार केला. टीव्हीके पक्षाच्या नेत्यांनीही तिरुचिरापल्ली पूर्व इथं रोड शो केला.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या एका आयटी कंपनीतल्या कथित धर्मांतर प्रकरणाचा पोलिसांनी सखोल तपास करावा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत. राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी काल झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले. या प्रकरणी दोषी व्यक्तींना कठोर शासन व्हावं, यासाठी तपासामध्ये कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची खात्री करावी, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

या बैठकीत मुख्यमंत्री फडनवीस यांनी मुंबईत गोरेगाव इथल्या अमली पदार्थ प्रकरणी कारवाईला गती देण्याचे निर्देशही दिले. ११ एप्रिल रोजी गोरेगाव इथल्या 'नेस्को' प्रदर्शन केंद्रातआयोजित एका कार्यक्रमात अमली पदार्थांच्या अती- सेवनामुळे एमबीए च्या दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता.

**<><><><><>**

राज्यात यंदाच्या खरीप हंगामात जास्तीत जास्त पेरणीचं नियोजन केलं असून त्यादृष्टीने कृषी विभागाने पूर्वतयारी सुरू केल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. ‘एल निनोचा’ शेतीवर होणारा संभाव्य परिणाम, पर्जन्यमानाची स्थिती आणि त्यानुसार पीक पद्धती यावर चर्चा करण्यासाठी पुण्यात राज्यस्तरीय कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं असून, शिवाजीनगर इथं ‘सारथी’च्या नव्या सभागृहात उद्या सकाळी साडे दहा वाजता ही कार्यशाळा आयोजित केल्याची माहितीही भरणे यांनी दिली.

**<><><><><>**

राज्यासह देशभरात आज अक्षय्य तृतीयेचा सण उत्साहात साजरा होत आहे. साडेतीन मुहुर्तांपैकी एक समजला जाणारा हा सण, कधीही नाश न पावणारं सुख आणि समृद्धीचं प्रतीक समजला जातो. अक्षय्य तृतीयेच्या निमित्तानं महाराष्ट्रात मुंबईसह राज्यभरात सणाचा उत्साह आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह, मराठवाड्यातल्या सर्व प्रमुख शहरांच्या बाजारपेठांमध्ये आज नागरिकांचा खरेदीचा उत्साह दिसून येत आहे. बाजारपेठ आंबे, डांगर आणि मातीच्या घागरींनी सजली आहे. आजच्या मुहूर्तावर राज्यात मोठ्या प्रमाणात विवाह सोहळे देखील होतात. हे लक्षात घेऊन, राज्य शासनानं बाल विवाह रोखण्यासाठी कडक

उपाययोजना केल्या आहेत. यंदा, सोन्याचे दर विक्रमी पातळीवर असले, तरी सोनं खरेदीचा उत्साह मात्र कायम आहे.

आज परशुराम जयंती आणि  महात्मा बसवेश्वर यांची जयंती देखील साजरी होत आहे. त्या निमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल जिष्णु देव वर्मा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरी हातखंबा इथं आज पहाटे लोखंडी सळ्या घेऊन जाणारा एक ट्रक विहिरीत कोसळून झालेल्या अपघातात ट्रकचा चालक आणि क्लिनर गंभीर जखमी झाले. अपघातापूर्वी या ट्रकनं तीन ते चार वाहनांना धडक दिल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. ट्रकच्या   क्लिनरला रुग्णालयात दाखल केलं असून, चालकाला गाडीतून बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु असल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

**<><><><><>**

बुलडाणा जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर आज पहाटे एक खासगी बस उलटून झालेल्या अपघातात एका बालकाचा मृत्यू झाला, तर २५ प्रवासी जखमी झाले. बस उलटल्यावर मागून येणारी गाडी त्यावर आपटून त्या गाडीचंही नुकसान झालं. जखमी प्रवासी  जवळच्या खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. बसचा  चालक आणि क्लिनर रील बनवण्यात व्यग्र असल्यामुळे हा अपघात झाल्याची माहिती प्रवाशांनी दिली.

**<><><><><>**

पनवेल तालुक्यात पाडेघर परिसरातल्या एका कार्गो कंपनीच्या रासायनिक गोदामात काल आग लागली. यावेळी झालेल्या स्फोटांमुळे परिसरात घबराट पसरली. आगीत कोणतीही हानी झाल्याचं वृत्त नाही.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यातल्या अड्याळ इथल्या एका युवकानं एका अल्पवयीन  मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचं उघडकीला आलं असून, पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आहे. संबंधित युवका विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**<><><><><>**

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून अजित आगरकर यांचा कार्यकाळ एका वर्षानं वाढवला आहे. २०२७ च्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीनं हा निर्णय घेतला असल्याचं नियामक मंडळानं म्हटलं आहे. जुलै २०२३ मध्ये आगरकर यांची वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती. त्यानंतर त्यांच्या आत्तापर्यंतच्या कार्यकाळात निवडलेल्या भारतीय संघांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या वतीनं आयोजित चार स्पर्धांच्या अंतिम फेरीत धडक मारली, आणि त्यापैकी दोन टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक तसंच, एका आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचं विजेतेपदही पटकावलं आहे.

<><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज कोलकत्त्याच्या ईडन गार्डन मैदानावर थोड्याच वेळात कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातल्या सामन्याला सुरुवात होईल.

या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि लखनऊ सूपर जाएंट्स यांच्यातही सामना होणार आहे. संध्याकाळी साडेसात वाजता चंदीगढच्या महाराजा यादविंद्र सिंग मैदानावर हा सामना खेळला जाईल.

//<><><><><>//